
आनंदी शिकारी





रोजर डुवोइसिन

मराठी: अश्विनी बर्वे

पानगळीचा एक चांगला दिवस होता आणि पाने पिवळी झाली होती. मिस्टर बॉबिन यांनी शिकारीचे नवीन कपडे घातले आणि आपली चमकदार नवीन बंदूक घेतली, आणि मग जंगलाकडे निघाले.

पण ते एक गोष्ट विसरले होते– की ते प्राण्यांवर प्रेम करत होते.... आणि मग मुले नक्कीच मिस्टर बॉबिन यांच्यावर प्रेम करतील जे नेहमी शिकार करण्यास उत्तेजन देण्याचा काही ना काही मार्ग शोधत असत.

“आनंदी शिकारी" एक खरी कहाणी आहे. खऱ्या मिस्टर बॉबिन यांनी जवळपास पंचवीस वर्षे ग्लैडस्टोन, न्यू जर्सीच्या जवळ जंगलात प्रत्येक शरद ऋतूत आनंदाने शिकार केली.

आनंदी शिकारी

रोजर डुवोइसिन



आनंदी शिकारी

मिस्टर बॉबिन जंगलाजवळ एका छोट्या घरात राहत असत. त्यांना आपल्या दाराच्या जवळ असणाऱ्या बाकड्यावर बसायला आणि डोंगर, आकाश आणि जंगली जनावरे बघत हुक्का ओढायला आवडत असे.



जेव्हा जंगल पिवळे झाले, तेव्हा त्यांनी शिकाऱ्यांना जंगलात जातांना बघितले. शिकाऱ्यांनी आपली पिवळी टोपी आणि मोठे कोट घातलेले होते. पिवळ्या मोज्यांसहित मोठे काळे बूट, काडतुसांच्या बरोबर मोठे पांढरे पट्टे आणि त्यांच्या हातात मोठ-मोठ्या बंदुका होत्या.

जेव्हा ते शिकारी छोटे ससे, तितर आणि छोट्या पक्षांच्या शोधात निघत तेव्हा ते कवचधारी शूरवीरांसारखे दिसत.



“हे नक्कीच चांगले होईल,” मिस्टर बॉबिनने विचार केला.

आणि मग त्यांनी आपल्या हुक्क्यातून धूर बाहेर सोडला.

“इतके मोठे आणि साहसी दिसणे आणि जंगलात जाणे, शेताच्यापलीकडे, डोंगराच्या वर आणि दऱ्याखोऱ्यात.

पॉलिश करण्यासाठी एक चांगली बंदूक ठेवणे गरजेची आहे.”

मग मिस्टर बॉबिनने स्वतःसाठी खरेदी केली एक मोठी पिवळी टोपी आणि एक मोठा पिवळा कोट, पिवळे मोज्याबरोबर मोठे काळे बूट,

काडतुसांनी भरलेला एक मोठा पट्टा आणि हातात पकडण्यासाठी एक मोठी बंदूक.

आणि त्यानंतर मिस्टर बॉबिन शिकार करण्यासाठी गेले.



जेव्हा मिस्टर बॉबिन यांना एका छोटा ससा दिसला.

झुडुपाच्या मागे गवत खातांना,

तेव्हा त्यांनी आपली बंदूक उचलली आणि त्याच्या ‘भोकातून’ निशाणा साधला.

त्यांनी डोकावले... अजून वाकून बघितले.... आणखीन डोकावून बघितले.

आणि मग त्यांनी आपली बंदूक खाली ठेवली आणि खोकत म्हटले,

... खो..खो—खो.” सशाने वर बघितले आणि म्हटले, “अरे देवा, एक शिकारी!”

आणि मग तीन उड्या मारून ससा मोठ्या घासात गायब झाला.

“तो एक वेगवान छोटा हुशार ससा होता,” मिस्टर बॉबिनने हसत म्हटले.

आणि मग त्यांनी आपली चमकदार बंदूक रुमालाला पुसली.



जेव्हा मिस्टर बॉबिन यांनी एका खारीला दगडावर आक्रोड कुरडतांना बघितले, तेव्हा ते एका झाडाच्या मागे बंदूक घेऊन बसले, आणि मग त्यांनी नेम साधला.... त्यांनी फक्त नेम धरला. आणि मग त्यांनी छोटीशी धून गुणगुणली : "डी-दम, डी-दम."

खारीने आपले आक्रोड टाकून दिले आणि म्हणाली,

“ओह, एक शिकारी शिकार करण्यासाठी येत आहे."

मग एक उडी मारून खारुताई झाडावर चढली.

“ती तर एक चतुर खारुताई होती.” मिस्टर बॉबिन म्हणाले.

आणि मग मिस्टर बॉबिन आपला सहलीसाठी आणलेला डबा खायला बसले.



मिस्टर बॉबिन त्या संध्याकाळी उशिरा घरी परतले.

ते थकलेले होते पण ते खुश होते.

ते म्हणाले, “शिकार करणे तसे नव्हते जसा मी विचार केला होता.”

“पण तरीही आजचा शिकारीचा दिवस खूप छान होता. मी शेतातून आणि जंगलातून चांगली चक्कर मारली.”

आणि मग त्यांनी आपली चांगली बंदूक चमकावली आणि मग त्यांनी चवळीची भाजी खात आणि चहा घेत जेवण केले, नंतर ते अंथरुणावर झोपले.



जेव्हा मिस्टर बॉबिन पुढच्यावेळी शिकार करण्यासाठी गेले,

तेव्हा त्यांनी एक तितर जंगलात द्राक्षे तोडतांना बघितले.

मिस्टर बॉबिन त्वरित एका खडकाच्या मागे लपले आणी त्यांनी आपली पॉलिश केलेली बबंदुक उचलली.

खूप शांत... खूप शांत...... एकदम शांत,


आणि मग त्यांनी शिट्टी वाजवली, "एसएसएसएस... एसएसएस... एसएसएसएसएस!"

"अरे बाप रे!" ओरडले, "बंदूकवाला शिकारी!"

आणि मग आपले जड पंख फडफडवत तितर झाडांमध्ये उडून गेले.

“तो रूपाने विशेष असा एक सुंदर पक्षी होता पण तो आवाज करणारा होता.”

मिस्टर बॉबिनने आनंदाने म्हटले, आणि मग त्यांनी आपल्या टोपीला लावण्यासाठी एक पंख उचलले.



जेव्हा मिस्टर बॉबिनने तलावाच्या किनाऱ्यावर एका छोट्या बदकाला किडे खातांना बघितले,

तेव्हा ते पडलेल्या झाडाच्या खाली आपली बंदूक ठेवून ते पालथे पडले आणि बघत राहिले....

आणि बघत राहिले.... बास फक्त बघत राहिले,

आणि मग त्यांनी आपला रुमाल काढला आणि जोरात आपले नाक शिंकरले.

"क्वॅक, क्वॅक, क्वॅक," एका किड्याचा गळा दाबत छोटे बदक ओरडले,

"एक शिकारी आला आहे! चल, इथे थांबायला नको."

आणि मग बदकाने आपले डोके पाण्यात घातले आणि निघून गेले.

"बदक खूप प्रेमळ पक्षी असतात." मिस्टर बॉबिनने आपला हुक्का पेटवत म्हटले.



जेव्हा मिस्टर बॉबिन त्या रात्री घरी आले तेव्हा ते पहिल्यापेक्षा अधिक खुश होते.

"शिकार करणे एवढे मज़ेदार आहे," ते म्हणाले.

"आज मी दऱ्याखोऱ्यातून चांगली रपेट मारली."

मग त्यांनी आपली बंदूक चमकावली आणि पॅनकेक आणि दूध पिऊन भरपेट जेवण केले.



जेव्हा पुढच्या वर्षी हवा एकदम थंड होती, पण मिस्टर बॉबिन परत शिकार करण्यासाठी गेले.

त्यांनी एका कोल्हयाला दगडाच्या भिंतीवर ऊन खातांना बघितले.

ते आपल्या बंदुकीला स्थिर ठेवण्यासाठी एका झाडाचा आधार घेत खाली वाकले...

एकदम स्थिर...... खूप स्थिर, आणि मग शेवटी ते शिंकले: "आकच्छी! आकच्छी!!"

"ठीक आहे," कोल्ह्याने डोळ्याच्या कोपऱ्यातून बघत म्हटले, "ते आपल्या चमकदार बंदुकीबरोबर मिस्टर बॉबिनच असतील."

आणि मग कोल्ह्याने तिथेचे एक जांभई दिली आणि झोपून घेतले.

"ही जंगलातली सगळ्यात मोठा, आणि सगळ्यात चलाख कोल्हा आहे," मिस्टर बॉबिनने त्या भेटीनंतर खूप प्रसन्न होऊन म्हटले.



जेव्हा मिस्टर बॉबिन यांनी एका ओपस्समला झऱ्याच्या किनाऱ्यावर सफरचंद खातांना बघितले. मग त्यांनी एका जुन्या गोठ्याचा सहारा घेतला. आणि मग आपली चमकदार बंदूक खांद्यावर ठेवली.

मग हळूहळू लक्षपूर्वक..... आणि खूप सावधानपूर्वक

त्यांनी आपल्या गालावर अचानक एक थप्पड मारली,

“हत तेरे की! एक मधमाशी मला चावली.

"अरे!" ओपस्सम म्हणाले, जे वर बघण्यात व्यग्र होते,

“बघ मिस्टर बॉबिन आले आहेत. मला वाटते की जेव्हा ते शिकार करायला जातात तेव्हा ते आपली बंदूक बरोबर घेऊन जातात.”

आणि मग ओपस्सम अजून चांगचांगली सफरचंदे तोडत राहिला.

“तो एक खूप बुद्धिमान ओपस्सम होता," मिस्टर बॉबिन म्हणाले.

“हिवाळा येण्याच्या आधी तो पोटभर जेवण करत होता.”



"ठीक आहे," मिस्टर बॉबिन यांनी त्या रात्री घरी येऊन म्हटले.

"आज अजून एक चांगला शिकारीचा दिवस होता. मी जंगलात एक सुंदर फेरफटका मारला."

आणि मग त्यांनी आपली मोठी पिवळी टोपी आणि आपला मोठा पिवळा कोट, पिवळे मोज्यांबरोबर आपले काळे बूट, काडतुसांचा पट्टा आणि आपली मोठी चमकदार बंदूक वेगळी ठेवली. मग त्यांनी नूडल्स, सफरचंदाची चटणी आणि हॉट चॉकलेटचे स्वादिष्ट जेवण केले.



अनेक वर्षांपर्यंत दरवर्षी जेव्हा जंगलातील झाडांची पाने पिवळी होत तेव्हा मिस्टर बॉबिन शिकार करण्यासाठी जात असत.

जंगलातून जातांना ते शेतातून पहाडावर जात असत.

त्यांना सगळं जंगल, झरे आणि जनावर माहीत होते.

पण एक वर्ष त्यांनी बघितले की मोठी पिवळी टोपी आणि मोठा पिवळा कोट घालून पूर्ण दिवसभर चालणे अवघड होत आहे.

पिवळ्या मोज्यांबरोबर काळे बूट,

काडतूसाचा मोठा पट्टा, मोठी चमकदार बंदूक चालवणे कठीण झाले होते. कदाचित मिस्टर बॉबिन आता खूप म्हातारे झाले होते.

ते खूप दुःखी होते.



आता सगळे प्राणी खूप चिंतेत होते,

मिस्टर बॉबिन यांना काय झाले आहे?

“ते आता शिकार का करत नाही?” बदकाने विचारले. “मला त्यांची खूप आठवण येत आहे.”

“कदाचित ते कुठे दूर गेले असतील,” ससा म्हणाला.

“कदाचित ते आजारी असतील,” तितर म्हणाले,

“मी तुम्हांला सांगेन,” कोल्हा म्हणाला.

"मिस्टर बॉबिन शिकार करू शकत नाही कारण आता ते खूप म्हातारे झाले आहेत.

आता तर ते फक्त आपल्या घराच्या दाराजवळ असलेल्या बाकड्यावर बसून फक्त हुक्का पितात.”

“तर मग चला त्यांना भेटून येऊ या,” अस्वल म्हणाले.



मग अस्वल, हरिण आणि कोल्हा,ससा, खारुताई, सुतार पक्षी,आणि ओपस्सम, तितर आणि बटेर एक प्रकारची कोंबडी, दुपारी मिस्टर बोबिन बरोबर त्यांच्या छोट्याशा घराच्या दरवाज्याजवळ बसण्यासाठी आले.

त्यामुळे, मिस्टर बॉबिनची बाकी वर्षे आनंदात गेली.

अंत



